प्रति,

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)

महाराष्ट्र राज्य मुंबई

यांचे सेवेशी

मार्फत : पोलीस निरीक्षक महामार्ग विभाग नांदेड

पासून : प्रभारी अधिकारी महामार्ग पोलीक केंद्र उमरखेड (कोसदनी), जि. यवतमाळ

विषय : दिनांक ०५/०५/२०१६ रोजी सायंकाळी उद्भवलेल्या चक्रीवादळामुळे महामार्ग केंद्राचे नुकसान झाल्या बाबत अहवाल.

महोदय,

सविनय सादर आहे की, यवतमाळ जिल्ह्यात उमरखेड (कोसदनी) येथील शासकीय जागेवर महामार्ग पोलीस केंद्र आहे. सदर केंद्रावर एक पो.उप.नि. व ३ पोलीस हवालदार व एक चालक कार्यरत आहेत.

दिनांक ०५/०५/२०१६ रोज सायंकाळी १८:०४ वाजता वादळ सुरु झाले. हवेचा तुफान वेग होता. ते वादळ १९:३० पर्यंत जोरात सुरू होते. ते रात्री २१:०० वाजता शांत झाले. त्यावेळी सदर केंद्रावर ५ कर्मचारी हजर होते. अचानक टिन पत्र्याची असलेले चौकी या वादळामुळे कोलमडली. त्यात ए.एस.आय. सवाणे व पो.हे.कॉ. ३९० रवी हे चौकीच्या मलब्याखाली दबल्या गेले. परंतू या घटनेत त्यांना कोणतीही ईजा झाली नाही. दोन्ही चौकीवरील टिनपत्रे उन्मळून पडली व चौकी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. त्यामुळे अंदाजे ६०,०००/- रुपयांचे नुकसान झाले आहे. चौकीचे टिनपत्रे ऊडून गेल्यामुळे कागदपत्रे अस्ताव्यस्त झाली व अचानक जोराचा पाऊस झाल्याने महत्वाचे रेकॉर्ड, कॅशबुक, जी.एन. पावती, पुस्तके, ओ.सी., स्टेशन डायरी, आवक-जावक रजिस्टर व इतर रजिस्टर फाईल असे ओले झाले असून नुकसान झाले आहे.

तसेच सदर वादळामुळे स्टेट हायवे ३ वरील झाडे पडल्याने कोसदनी शिवारात १८:३० ते २१:०० वा. पर्यंत वाहतूक ठप झाली होती. गावक-यांचे मदतीने रस्त्यावरील झाडे बाजूला करून मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली सध्या महामार्ग पोलीस केंद्रावर कर्मचा-यांना राहण्यासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही.

करिता सविनय अहवाल सेवेशी सादर आहे.

(वनदेव कापडे)

पो.उप.नि. प्रभारी अधिकारी

महामार्ग केंद्र उमरखेड (कोसदनी)

प्रतिलिपी :१) मा. पोलीस अधीक्षक महामार्ग विभाग नागपूर यांना सादर

२) आर.आर. रोडगे, पो.नि. महामार्ग विभाग नांदेड यांना सादर




